# Positive Story of Nagpur Rural Police

दिनांक ११/०४/२०२६

## नागपूर ग्रामीण जिल्ह्यात अपघात व मृत्यू दरात लक्षणीय घट
## गेल्या ४ वर्षातील सर्वात कमी मृत्यूंची नोंद

नागपूर ग्रामीण पोलिसांनी सातत्यपूर्ण व परिणामकारक रस्ते सुरक्षा उपाययोजनांद्वारे रस्ते अपघात व मृत्यूंमध्ये लक्षणीय घट साध्य केली आहे. सन २०२६ च्या पहिल्या तिमाहीत (जानेवारी ते मार्च) सन २०२५ च्या तुलनेत रस्ते अपघात आणि मृत्यूंमध्ये उल्लेखनीय घट नोंदविण्यात आली आहे.

देशातील रस्ते अपघातांच्या दृष्टीने उच्च प्राधान्य असलेल्या टॉप १०० जिल्ह्यांमध्ये नागपूर जिल्ह्याचा समावेश असून, या अनुषंगाने येथे सेव्ह लाईफ फाउंडेशन (**SaveLife Foundation**) यांच्या तांत्रिक सहकार्याने **Zero Fatality District (ZFD)** उपक्रम राबविण्यात येत आहे. सदर उपक्रम मा. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्यमंत्री कार्यालय (**CMO**) आणि मा. पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निरीक्षणाखाली प्रभावीपणे अंमलात आणला जात आहे.

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात सर्वसमावेशक व डेटा–आधारित रस्ते सुरक्षा धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, या उपक्रमामुळे रस्ते सुरक्षा उपाययोजनांना अधिक बळकटी प्राप्त होत आहे.

सदर कालावधीत प्राणांतिक रस्ते अपघातांमध्ये २४ टक्क्यांनी, मृत्यूंमध्ये २७ टक्क्यांनी, तर जखमींच्या संख्येत १० टक्क्यांनी घट झाली आहे. तसेच, महाराष्ट्र राज्यात रस्ते अपघातांमध्ये घट नोंदविणाऱ्या जिल्ह्यांमध्ये नागपूर ग्रामीण जिल्ह्याने तिसरे स्थान प्राप्त केले आहे.

**MAHARASHTRA STATE**

Total Accidents Comparative " Descending Order "

| Sr. No | POLICE UNIT | JAN TO MAR 2025* | | | JAN TO MAR 2026 | | | COMPARATIVE % (JAN TO MAR 2025*- 2026) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Total Accident | Total Killed | Total Injured | Total Accident | Total Killed | Total Injured | Total Accident | Total Killed | Total Injured |
| 1 | Gadchiroli | 54 | 38 | 31 | 72 | 27 | 88 | 33 | -29 | 184 |
| 2 | MB-VV | 182 | 38 | 168 | 230 | 44 | 210 | 26 | 16 | 25 |
| 3 | Ratnagiri | 85 | 29 | 85 | 100 | 32 | 105 | 18 | 10 | 24 |
| 4 | Latur | 194 | 93 | 128 | 223 | 113 | 121 | 15 | 22 | -5 |
| 5 | Dhule | 159 | 94 | 151 | 181 | 94 | 185 | 14 | 0 | 23 |
| 6 | Raigad | 154 | 66 | 171 | 175 | 64 | 221 | 14 | -3 | 29 |
| 7 | Gondia | 92 | 52 | 47 | 104 | 60 | 72 | 13 | 15 | 53 |
| **8** | **Pune R** | 482 | 261 | 373 | 532 | 250 | 339 | 10 | -4 | -9 |
| 9 | Navi Mumbai | 206 | 85 | 180 | 227 | 69 | 215 | 10 | -19 | 19 |
| 10 | Nasik City | 140 | 57 | 128 | 153 | 41 | 148 | 9 | -28 | 16 |
| 11 | C.S.Nagar R | 219 | 146 | 105 | 239 | 128 | 191 | 9 | -12 | 82 |
| 12 | Jalna | 169 | 94 | 153 | 180 | 95 | 150 | 7 | 1 | -2 |
| **13** | **Solapur R** | 302 | 167 | 331 | 318 | 190 | 338 | 5 | 14 | 2 |
| 14 | Amravati City | 100 | 18 | 93 | 105 | 28 | 100 | 5 | 56 | 8 |
| **15** | **PCPC** | 323 | 84 | 288 | 338 | 90 | 352 | 5 | 7 | 22 |
| 16 | Thane R | 108 | 58 | 100 | 113 | 61 | 108 | 5 | 5 | 8 |
| 17 | Amravati R | 133 | 83 | 109 | 139 | 92 | 108 | 5 | 11 | -1 |
| **18** | **Pune City** | 339 | 85 | 265 | 354 | 82 | 280 | 4 | -4 | 6 |
| 19 | Beed | 187 | 121 | 120 | 194 | 81 | 125 | 4 | -33 | 4 |
| **20** | **Thane City** | 296 | 66 | 300 | 304 | 64 | 297 | 3 | -3 | -1 |
| **21** | **Nasik R** | 377 | 216 | 198 | 382 | 225 | 435 | 1 | 4 | 120 |
| 22 | Hingoli | 115 | 68 | 93 | 116 | 63 | 90 | 1 | -7 | -3 |
| 23 | Akola | 125 | 59 | 88 | 126 | 47 | 104 | 1 | -20 | 18 |
| **24** | **Ahilyanagar** | 488 | 231 | 396 | 489 | 213 | 360 | 0 | -8 | -9 |
| 25 | Sangli | 257 | 149 | 208 | 255 | 133 | 189 | -1 | -11 | -9 |
| **26** | **Mumbai City** | 666 | 103 | 677 | 660 | 76 | 700 | -1 | -26 | 3 |
| 27 | Chandrapur | 197 | 93 | 183 | 188 | 79 | 184 | -5 | -15 | 1 |
| 28 | Wardha | 109 | 44 | 134 | 104 | 52 | 89 | -5 | 18 | -34 |
| 29 | C.S.Nagar City | 164 | 40 | 140 | 155 | 52 | 133 | -5 | 30 | -5 |
| 30 | Parbhani | 142 | 75 | 117 | 133 | 67 | 92 | -6 | -11 | -21 |
| 31 | Solapur City | 61 | 22 | 75 | 57 | 21 | 39 | -7 | -5 | -48 |
| 32 | Satara | 264 | 136 | 194 | 244 | 119 | 188 | -8 | -13 | -3 |
| 33 | Jalgaon | 229 | 121 | 178 | 210 | 123 | 154 | -8 | 2 | -13 |
| 34 | Palghar | 146 | 84 | 73 | 133 | 78 | 93 | -9 | -7 | 27 |
| 35 | Buldhana | 186 | 104 | 101 | 168 | 98 | 107 | -10 | -6 | 6 |
| 36 | Bhandara | 111 | 45 | 92 | 96 | 42 | 103 | -14 | -7 | 12 |
| **37** | **Kolhapur** | 296 | 117 | 259 | 255 | 106 | 224 | -14 | -9 | -14 |
| **38** | **Nagpur City** | 331 | 82 | 348 | 284 | 60 | 298 | -14 | -27 | -14 |
| 39 | Nandurbar | 95 | 52 | 119 | 78 | 47 | 137 | -18 | -10 | 15 |
| 40 | Sindhudurg | 50 | 23 | 61 | 41 | 17 | 54 | -18 | -26 | -11 |
| 41 | Yavatmal | 237 | 134 | 180 | 186 | 116 | 110 | -22 | -13 | -39 |
| 42 | Dharashiv | 184 | 108 | 183 | 141 | 90 | 122 | -23 | -17 | -33 |
| 43 | Nagpur R | 274 | 124 | 281 | 209 | 91 | 252 | -24 | -27 | -10 |
| 44 | Nanded | 257 | 145 | 160 | 193 | 102 | 104 | -25 | -30 | -35 |
| 45 | Washim | 100 | 69 | 58 | 75 | 36 | 61 | -25 | -48 | 5 |
| | TOTAL | 9385 | 4179 | 7922 | 9259 | 3858 | 8175 | -1 | -8 | 3 |

Page 1

Figure 1: Road Crash Data in Maharashtra

विशेष म्हणजे, सन २०२६ च्या पहिल्या तिमाहीत (**Q1**) मागील चार वर्षांच्या त्याच कालावधीच्या तुलनेत सर्वात कमी रस्ते अपघात आणि मृत्यूंची नोंद झाली आहे.





Figure 2: Road Crash Fatality Trend Q1 (Jan-Mar) 2022 to 2026

अपघातांच्या सविस्तर विश्लेषणातून विशिष्ट धडक प्रकारांमध्ये लक्षणीय घट झाल्याचे निदर्शनास आले आहे. यामध्ये **M2W** विरुद्ध **M2W** अपघातांमध्ये ७२ टक्क्यांनी घट, पादचारी विरुद्ध ट्रक अपघातांमध्ये ६४ टक्कयांनी घट, तसेच **M2W** विरुद्ध ट्रक अपघातांमध्ये २५ टक्कयांनी घट नोंदविण्यात आली आहे. याशिवाय, ओळखण्यात आलेल्या १८ उच्च–मृत्यू प्रवण रस्त्यावर एकूण २८ टक्क्यांनी घट आढळून आली आहे.

**Zero Fatality District (ZFD)** उपक्रमांतर्गत नागपूर ग्रामीण पोलिसांनी डेटा–आधारित अंमलबजावणी कृती आराखडे तयार करून अतिवेग, धोकादायक वाहन चालविणे तसेच मद्यप्राशन करून वाहन चालविणे यांसारख्या प्रमुख जोखीम घटकांवर

लक्ष केंद्रित करत सातत्यपूर्ण व लक्षित विशेष मोहिमा राबविल्या आहेत. या अंमलबजावणीमुळे रस्ते सुरक्षा स्थितीत लक्षणीय सुधारणा झाली आहे.

तसेच, सदर उपक्रमांतर्गत महत्त्वाच्या ठिकाणी रस्ते सुरक्षा अभियांत्रिकी उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात आली आहे. उच्च मृत्यू प्रवण मार्गांवरील उच्च—जोखीम ठिकाणांची ओळख करून त्या ठिकाणी अभियांत्रिकी सुधारणा करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असून, त्यामुळे अशा ठिकाणी मृत्यूंच्या संख्येत घट झाली आहे.

नागपूर ग्रामीण पोलीस रस्ते सुरक्षेस अधिक बळकटी देण्यासाठी कटिबद्ध असून सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून सुरक्षित रस्ते सुनिश्चित करण्यास सहकार्य करावे.

TheHitavada
Nagpur City Line | 2026-04-13 | Page- 8
ehitavada.com

# Data-driven policing paying off: Nagpur Rural sees dramatic drop in fatal mishaps

■ By Dheeraj Fartode

IN A major relief to road users, Nagpur Rural district has reported a sharp decline in road accidents and fatalities in the first three months of 2026. The latest data not only shows improvement over last year but also marks the lowest number of deaths recorded in the past four years. It signaled that sustained efforts by the Rural Police are beginning to pay off.

Between January and March 2026, the district recorded 85 fatal accidents and 91 deaths. When placed against previous years, the improvement becomes striking. In 2025, the same period saw 119 fatal accidents and 129 deaths. Going further back, 2024 had 108 accidents and 116 deaths, 2023 saw 110 accidents and 113 deaths, while 2022 recorded the highest with 132 accidents and 148 deaths. This steady decline, especially the sharp fall from 2025 to 2026, shows a 24 per cent drop in fatal accidents and a 27 per cent reduction in deaths within just one year. Even injuries have dropped by 10 per cent indicating not just fewer crashes, but also less severe ones.

## Once among country's high-accident districts

NAGPUR Rural, once counted among the country's top 100 high-accident districts, is now slowly rewriting its story.

## Aim to protect every citizen: SP Dr Poddar



"THIS improvement shows that focused, data-driven policing can save lives. We identified high-risk areas, acted on real data and enforced rules strictly. Our aim is not just to reduce numbers, but to protect every citizen," said Dr Poddar.

A key role in this turnaround is being played by the 'Fatal-Free District' (FFD) initiative.

Officials say, the real change lies in how data is being used on the ground. Under the leadership of Superintendent of Police Dr Harssh A Poddar, police have shifted from routine enforcement to targeted action. Instead of random checks, teams now focus on specific accident-prone roads, peak hours and high-risk behaviors.

The results are visible in the type of accidents being reduced. For instance, two-wheeler collisions with other two-wheelers have dropped by a massive 72 per cent, while accidents involving pedestrians and heavy vehicles like tankers have reduced by 64 per cent. Even two-wheeler and tanker crashes have gone down by 25 per cent. These are not small gains - they reflect changes in both enforcement and driver behaviour.



| Year | Fatal accidents (Q1) | Deaths (Q1) |
|---|---|---|
| 2022 | 132 | 148 |
| 2023 | 110 | 113 |
| 2024 | 108 | 116 |
| 2025 | 119 | 129 |
| 2026 | 85 | 91 |

## Results from 18 high-fatality roads

ANOTHER key success is seen on 18 high-fatality roads, where deaths have dropped by 28 per cent. These stretches were earlier known for frequent crashes. Now, with better signage, speed monitoring and road engineering fixes, they are becoming safer.

Police credit a mix of strict enforcement and awareness campaigns under the 'Road Accident Prevention District' (RAPD) initiative. Special drives against speeding, drunk driving, and reckless riding have been carried out regularly. At the same time, the police have worked on fixing road design issues - often an ignored cause behind accidents. Officials also say, this is not just about numbers but about lives saved. Each percentage drop means dozens of families spared from tragedy.

Despite the progress, police warn against complacency. "The trend is encouraging, but road safety needs continuous effort," an officer said and urged citizens to follow traffic rules strictly.

Powered by Bharati Web

# 8-Yr Low, New High: Road Accident Deaths Drop 30% In Nagpur Rural

Soumitra.Bose
@timesofindia.com

**Nagpur:** The Nagpur rural district recorded 85 fatal accidents resulting in 91 deaths in the first quarter (January-March) 2026, the lowest such figures in the last eight years. The data reflects improved road safety across the Nagpur rural areas.

Compared to the corresponding period in 2025, the district registered a sharp 30% reduction in fatalities and an overall 26% decline in accidents at 18 identified high-fatality black spots. Nagpur rural district stood third in the list of Maharashtra districts with least road accidents.

The data, released as part of the state's comparative road accident statistics, shows a consistent downward trend in Nagpur rural district from 2022 to 2026. Fatal crashes fell from 132 in the first quarter (January-March) 2022 to 85 in the corresponding period in 2026, while fatalities dropped from 148 to 91.

## 26% DECLINE IN ACCIDENTS AT 18 HIGH-FATALITY BLACK SPOTS

Compared to first quarter of 2025, Nagpur rural district registered a 30% reduction in fatalities and 26% decline in accidents at 18 identified high-fatality black spots. The district stood third in the list of Maharashtra districts with least road accidents.




> Our data-driven strategy, backed by strict enforcement against speeding and dangerous driving, black spot corrections, vehicle fitness checks has delivered results at this scale for the first time in the district **HARSSH PODDAR** | SP, NAGPUR RURAL

The reduction in fatal accidents is the outcome of the Zero Fatality District (ZFD) programme implemented by Nagpur rural police in partnership with SaveLIFE Foundation. "The initiative employs rigorous data analytics to identify high-risk locations, corridors and behaviours, followed by targeted interventions under the 4Es framework — Engineering, Enforcement, Education and Emergency Care," said Harssh Poddar, Superintendent of Police, Nagpur Rural, who is leading the ZFD initiative.

Poddar attributed success to a scientific, multi-stakeholder approach. "Our data-driven strategy, backed by strict enforcement against speeding and dangerous driving, black spot corrections, vehicle fitness checks has delivered results for the first time at this scale in the district. Focused public awareness campaigns too played a big role," said SP Poddar. Poddar, known for pioneering AI applications in policing through the MARVEL unit, emphasised sustained focus on high-risk rural highways and state roads.

In the broader context, the state continues to face challenges with 36,450 road accidents and 15,549 fatalities recorded in 2025. Against this backdrop, Nagpur Rural's performance stands out as a beacon of what targeted, evidence-based interventions can achieve, Poddar further added.

सकाळ

# नागपूर ग्रामीणमध्ये अपघात, मृत्यूसंख्येत घट

## राज्यात तिसरे स्थान : अपघातात २४ तर मृत्यूंमध्ये २७ टक्क्यांची घसरण

■ सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. १२ : नागपूर ग्रामीण पोलिसांनी रस्ते सुरक्षेसाठी राबविलेल्या उपाययोजनांना यश मिळाले असून, जानेवारी ते मार्च २०२६ या पहिल्या तिमाहीत अपघात आणि मृत्यूंमध्ये लक्षणीय घट नोंदवली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत प्राणांतिक अपघात २४ टक्क्यांनी, मृत्यू २७ टक्क्यांनी, तर जखमींची संख्या १० टक्क्यांनी घटली आहे. राज्यात अपघात कमी करणाऱ्या जिल्ह्यांमध्ये नागपूर ग्रामीणने तिसरे स्थान पटकावले आहे.

देशातील अपघातप्रवण जिल्ह्यांमध्ये गणल्या जाणाऱ्या नागपूर ग्रामीणमध्ये 'झिरो फॅटॅलिटी डिस्ट्रिक्ट' (झेडएफडी) उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत



आहे. सेव्ह लाईफ फाऊंडेशन यांच्या तांत्रिक सहकार्याने हा उपक्रम राबविला जात आहे. पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांच्या नेतृत्वाखाली डेटा-आधारित नियोजनावर भर देण्यात आला. अपघातप्रवण १८ मार्गांवर विशेष उपाययोजना राबवून अपघातांमध्ये २८ टक्के घट साधण्यात आली. दुचाकी अपघातांमध्ये ७२ टक्के, पादचारी-ट्रक अपघातांमध्ये ६४ टक्के, तर दुचाकी-ट्रक अपघातांमध्ये २५ टक्के घट झाली

| नागपूर ग्रामीणची कामगिरी | |
|---|---|
| अपघातात घट | २४ टक्के |
| मृत्यूत घट | २७ टक्के |
| जखमींमध्ये घट | १० टक्के |

आहे. यासोबतच अतिवेग, मद्य प्राशन करून वाहन चालवणे व धोकादायक ड्रायव्हिंगविरोधात विशेष मोहिमा राबविण्यात आल्या. स्पीडब्रेकर्स, साइन बोर्ड व प्रकाशयोजना यांसारख्या उपायांमुळे अपघातांवर नियंत्रण मिळविण्यात मदत झाली. याशिवाय घरफोडी, वाहनचोरीसह २६ गुन्ह्यांची उकल, ७३८ आरोपींची परेड व अंमली पदार्थविरोधातील कारवाईमुळे नागपूर ग्रामीण पोलिसांची कामगिरी उंचावली आहे.

| | |
|---|---|
| उच्च जोखीम मार्ग | १८ |
| त्या मार्गांवरील अपघातात घट | २८ टक्के |
| दुचाकी अपघातात घट | ७२ टक्के |
| पादचारी-ट्रक अपघातात घट | ६४ टक्के |
| दुचाकी-ट्रक अपघातात घट | २५ टक्के |

| | |
|---|---|
| राज्यात स्थान | तिसरे |
| उघडकीस आलेले गुन्हे | २६ |
| आरोपी परेड | ७३८ |

Nagpur, NagpurGramin
13/04/2026 Page No. 4

# नागपूर जिल्ह्यात अपघात-मृत्यू दरात घट; चार वर्षांतील नीचांक

**नागपूर** : नागपूर (ग्रामीण) जिल्ह्यात रस्ते अपघात व मृत्यू दरात लक्षणीय घट झाल्याचे चित्र समोर आले आहे. २०२६ च्या पहिल्या तिमाहीत (जानेवारी ते मार्च) गेल्या चार वर्षांतील सर्वात कमी अपघात आणि मृत्यूंची नोंद झाली असून, २०२५ च्या तुलनेतही सुधारणा दिसून आली आहे.

जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या 'झिरो फॅटॅलिटी डिस्ट्रिक्ट' (ZFD) उपक्रमाचा यामध्ये मोठा वाटा असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. या उपक्रमासाठी SaveLife Foundation यांचे तांत्रिक सहकार्य लाभत असून, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या देखरेखीखाली याची अंमलबजावणी होत आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे प्राणांतिक अपघातांमध्ये २४ टक्के, मृत्यूंमध्ये २७ टक्के आणि जखमींच्या संख्येत १० टक्के घट



नोंदविण्यात आली आहे. राज्यातील अपघात घटविणाऱ्या जिल्ह्यांमध्ये नागपूर ग्रामीणने तिसरे स्थान मिळवले आहे.

अपघातांच्या प्रकारानुसारही घट दिसून आली आहे. दुचाकी-दुचाकी अपघातांमध्ये ७२ टक्के, पादचारी-ट्रक अपघातांमध्ये ६४ टक्के, तर दुचाकी-ट्रक अपघातांमध्ये २५ टक्के घट झाली आहे. तसेच, ओळखण्यात आलेल्या १८ उच्च-जोखीम मार्गांवर एकूण २८ टक्क्यांनी अपघात कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे.

उपक्रमांतर्गत अतिवेग, मद्यप्राशन करून वाहन चालविणे व धोकादायक वाहनचालना यांवर लक्ष केंद्रित करत विशेष मोहिमा राबविण्यात आल्या. यासोबतच अपघातप्रवण ठिकाणी अभियांत्रिकी सुधारणा करण्यात आल्या असून, त्यातूनही सकारात्मक परिणाम दिसून येत आहे.

दरम्यान, नागपूर ग्रामीण पोलीस प्रशासनाने नागरिकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. सुरक्षित वाहतुकीसाठी नागरिकांच्या सहकार्याची गरज असल्याचेही नमूद करण्यात आले.